Prepp

Practice, Learn and Achieve Your Goal with Prepp

# UGC NET Exam

Marathi

Simplifying
**Government Exams**

SSC CHSL | IAS EXAM | RRB NTPC | NTSE | CDS
SSC CGL | CBSE UGC NET | IBPS PO | NDA
SBI PO | IBPS CLERK | AFCAT | SSC JE | CTET
CSIR UGC NET | CAPF | IBPS RRB

www.prepp.in

# PAPER-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________
2. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________

OMR Sheet No. : ...............................................
(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |
(In figures as per admission card)

Roll No.___________________________________
(In words)

**D 3 8 1 0**

Time : 1 $^1/_4$ hours] [Maximum Marks : **100**

Number of Pages in this Booklet : **8** Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.
   **Example :** (A) (B) ● (D)
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **Answer Sheet given inside the Paper I Booklet only.** If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the test booklet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and OMR Answer sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।
   (iii) इस जाँच के बाद OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   उदाहरण : (A) (B) ● (D)
   जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये उत्तर-पत्रक पर ही अंकित करने हैं । यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर अपना नाम या ऐसा कोई भी निशान जिससे आपकी पहचान हो सके, किसी भी भाग पर दर्शाते या अंकित करते हैं तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित कर दिये जायेंगे ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर प्रश्न-पुस्तिका एवं OMR उत्तर-पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें ।
10. केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।
11. किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।
12. गलत उत्तरों के लिए कोई अंक काटे नहीं जाएँगे ।



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

# MARATHI
# मराठी
## Paper – II
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty (50)** objective type questions, each question carrying **two (2)** marks. Attempt **all** the questions.

टीप : या प्रश्नपत्रिकेत विविध विकल्प असलेले **पन्नास** (50) प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

**1.** 'दढमडह सामलंगे सहिरे अहिमाण कलहसीले य ।
दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे ।।'
हे वर्णन कोणत्या ग्रंथातील आहे ?
(A) राजीमतीप्रबोध
(B) मानसोल्लास
(C) कुवलयमाला
(D) धर्मोपदेशमाला

**2.** "एक देश भूमी थोर : एक देश मनुष्यें थोर : एक देश ऐश्वर्यें थोर : एक देश सामर्थ्यें थोर" हे भाष्य कोणाचे ?
(A) विश्वनाथबास बीडकर
(B) नागदेवाचार्य
(C) भास्करभट्ट बोरीकर
(D) दामोदर पंडित

**3.** "श्री चावुण्डराजे करवियलें श्री गंगराजे सुत्ताले करवियले" हा लेख कोणत्या शिलालेखात आढळतो ?
(A) दिवेआगर
(B) अक्षी
(C) गरसोळी
(D) श्रवणबेळगोळ

**4.** "जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी । झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी" हे प्रीतीचे वर्णन कोणी केले आहे ?
(A) रामजोशी
(B) प्रभाकर
(C) होनाजी बाळा
(D) सगनभाऊ

**5.** अरे विठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारटया ।।
तुझी रांड रंडकी जाली । जन्मसावित्री चुडा ल्याली ।।
विठ्ठलाशी अशा तीव्र भाषेत कोण बोलले ?
(A) निर्मळा
(B) जनाबाई
(C) बहिणाबाई
(D) कान्होपात्रा

**6.** कृ.वि. सोहनी यांनी पुढीलपैकी कोणती बखर लिहिली आहे ?
(A) भाऊसाहेबांची बखर
(B) शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र
(C) सभासदाची बखर
(D) पेशवे बखर

**7.** सिद्धान्त व सिद्धान्त मांडणारे यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (a) कॅथार्सिस | (i) डब्ल्यू.बी. गॅली |
| (b) भावनाविष्कार | (ii) ॲरिस्टॉटल |
| (c) भावनासंक्रमण | (iii) वर्ड्स्वर्थ |
| (d) स्वभावत: वादग्रस्त संकल्पना | (iv) टॉलस्टॉय |

(A) (a-ii) (b-iii) (c-iv) (d-i)
(B) (a-ii) (b-iii) (c-i) (d-iv)
(C) (a-i) (b-ii) (c-iv) (d-iii)
(D) (a-iv) (b-iii) (c-i) (d-ii)



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

8. ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (a) ध्वन्यालोक | (i) जगन्नाथ |
| (b) रसगंगाधर | (ii) विश्वनाथ |
| (c) साहित्यदर्पण | (iii) आनंदवर्धन |
| (d) औचित्यविचार चर्चा | (iv) अभिनवगुप्त |
| | (v) क्षेमेंद्र |

(A) (a-ii) (b-iii) (c-ii) (d-v)
(B) (a-iii) (b-i) (c-ii) (d-v)
(C) (a-iv) (b-ii) (c-iii) (d-i)
(D) (a-v) (b-i) (c-ii) (d-iii)

9. "वक्रोक्ती हे काव्याचे जीवित आहे", असे कुंतकाने म्हटले आहे आणि "वाक्यं रसात्मकं काव्यम्" हे मम्मटाचे मत आहे.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(C) विधानाचा उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक
(D) संपूर्ण विधान चूक

10. काव्याचा आत्मा ध्वनी आहे, तसेच लक्ष्यार्थसूचक शब्दालाही काव्याचे आत्मतत्त्व मानतात.
(A) संपूर्ण विधान बरोबर आहे.
(B) संपूर्ण विधान चूक आहे.
(C) विधानाचा पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक.
(D) विधानाचा उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक.

11. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र' हे वाक्य कोणत्या ग्रंथातील आहे ?
(A) गावगाडा
(B) कौटिल्याचे अर्थशास्त्र
(C) सभासदाची बखर
(D) आज्ञापत्र

12. 'तुम्ही कामे केलीत' या वाक्यातील प्रयोग कोणता ?
(A) कर्तरी
(B) कर्मणी
(C) कर्तृ-कर्मसंकर
(D) कर्मभावसंकर

13. आणि, आणखी, व, अन्, शिवाय यांना कोणत्या प्रकारची उभयान्वयी अव्यये म्हणतात ?
(A) विकल्पबोधक
(B) समुच्चयबोधक
(C) न्यूनत्वबोधक
(D) स्वरूपबोधक

14. तिळतिळ, हालहाल, तुकडेतुकडे, हळूहळू या शब्दांना काय म्हणतात ?
(A) पूर्णाभ्यस्त शब्द
(B) अंशाभ्यस्त शब्द
(C) अनुकरणवाचक शब्द
(D) तद्धित शब्द

15. संयुक्त क्रियापदाने दर्शविलेली क्रिया एकच असावयास हवी, त्या दोन वेगळ्या क्रिया असून चालणार नाही.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) विधानाचा पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक
(C) विधानाचा उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक
(D) संपूर्ण विधान चूक

16. देशीवादाच्या सिद्धान्ताला कोणी विरोध केला नाही ?
(A) विलास सारंग
(B) रंगनाथ पठारे
(C) रा.भा. पाटणकर
(D) म.सु. पाटील

17. पुढीलपैकी कोणत्या कादंबरीला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले नाही ?
(A) भूमी
(B) ताम्रपट
(C) कोसला
(D) झोंबी



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

18. पुढील नाटके कालक्रमानुसार लावा :
'आंधळ्यांची शाळा', 'शांतता ! कोर्ट चालू आहे', 'प्रेमा तुझा रंग कसा' 'नटसम्राट'.
(A) प्रेमा तुझा रंग कसा, शांतता ! कोर्ट चालू आहे, आंधळ्यांची शाळा, नटसम्राट.
(B) शांतता ! कोर्ट चालू आहे, प्रेमा तुझा रंग कसा, नटसम्राट, आंधळ्यांची शाळा.
(C) आंधळ्यांची शाळा, प्रेमा तुझा रंग कसा, शांतता ! कोर्ट चालू आहे, नटसम्राट.
(D) आंधळ्यांची शाळा, नटसम्राट, प्रेमा तुझा रंग कसा, शांतता ! कोर्ट चालू आहे.

19. संत साहित्य व आधुनिक साहित्य या दोहोंवर कोणी समीक्षा लिहिली नाही ?
(A) व.दि. कुलकर्णी
(B) श्री.व्यं. केतकर
(C) वा.ल. कुलकर्णी
(D) प्रभाकर पाध्ये

20. सौंदर्यशास्त्रीय ग्रंथ व सौंदर्यमीमांसक यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (a) सौंदर्यमीमांसा | (i) प्रभाकर पाध्ये |
| (b) सौंदर्य आणि साहित्य | (ii) शरद्च्चंद्र मुक्तिबोध |
| (c) सौंदर्यानुभव | (iii) रा.भा. पाटणकर |
| (d) सृष्टी सौंदर्य आणि साहित्यमूल्य | (iv) बा.सी. मर्ढेकर |

(A) (a-iii) (b-iv) (c-i) (d-ii)
(B) (a-i) (b-ii) (c-iii) (d-iv)
(C) (a-iv) (b-iii) (c-i) (d-ii)
(D) (a-ii) (b-iv) (c-i) (d-iii)

21. वि.वा. शिरवाडकर यांनी स्वतंत्र नाटके लिहिली त्याचप्रमाणे शेक्सपियरच्या नाटकांचे अनुवादही केले आहेत.
(A) विधानाचा पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) संपूर्ण विधान चूक
(D) विधानाचा पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर

22. पुढील अनुवादित साहित्यकृती व अनुवादक यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (a) देवदास | (i) कुसुमाग्रज |
| (b) रावण आणि एडी | (ii) भा.वि. वरेरकर |
| (c) अनुभवामृत | (iii) रेखा सबनीस |
| (d) मेघदूत | (iv) गो.वि. करंदीकर |
| | (v) दिलीप चित्रे |

(A) (a-iii) (b-ii) (c-v) (d-iv)
(B) (a-ii) (b-iii) (c-iv) (d-i)
(C) (a-v) (b-iii) (c-ii) (d-iv)
(D) (a-ii) (b-iii) (c-v) (d-i)

23. पुढीलपैकी कोणता शब्द शुद्धलेखनाच्या नियमानुसार लिहिला आहे ?
(A) बुद्धिजीवी
(B) बुद्धीजीवी
(C) बुद्धिजिवी
(D) बुद्धिजिवि

24. भाषणाचे वृत्त लिहिताना कोणत्या घटकास सर्वाधिक महत्त्व द्यावे ?
(A) भाषणास जमलेली गर्दी
(B) व्यासपीठावरील मान्यवर व्यक्तींचे उल्लेख
(C) वक्त्याच्या भाषणाचा सारांश
(D) वक्त्याचे आकर्षक व्यक्तिमत्त्व

25. ज्ञानपीठविजेत्या लेखकाची मुलाखत घेताना कोणत्या मुद्दयावर भर द्याल ?
(A) लेखकाचे व्यक्तिगत जीवन
(B) लेखकाच्या संपन्न अनुभवविश्वाचे तपशील
(C) वाचकांचा प्रतिसाद
(D) 'ज्ञानपीठ' मिळाल्याबद्दलची लेखकाची प्रतिक्रिया

26. रा.भा. पाटणकर यांनी पुढीलपैकी कोणते पुस्तक लिहिलेले नाही ?
(A) कमल देसाई यांचे कथाविश्व
(B) कथाकार शांताराम
(C) कांटची सौंदर्यमीमांसा
(D) सौंदर्याचे व्याकरण



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

**27.** समीक्षापद्धती व सिद्धान्तांचे प्रणेते यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (a) मार्क्सवादी | (i) एलन शॉवॉल्टर |
| (b) मनोविश्लेषणात्मक | (ii) लाँजायनस |
| (c) स्त्रीवादी | (iii) फ्रॉईड |
| (d) विरचनावादी | (iv) मार्क्स |
| | (v) देरिदा |

(A) (a-ii) (b-v) (c-iv) (d-i)
(B) (a-i) (b-ii) (c-v) (d-iv)
(C) (a-iv) (b-iii) (c-i) (d-v)
(D) (a-iii) (b-iv) (c-ii) (d-i)

**28.** ज्या भाषिक रूपाचे इतर कोणत्याही भाषिक रूपाशी स्वनात्मक / अर्थात्मक साम्य नसते असे रूप म्हणजे काय ?
(A) स्वनिम
(B) पदिम
(C) अर्थिम
(D) पदांतर

**29.** मानवी भाषेच्या व्याकरणिक, स्वनिमिक, पदस्वनिमिक या केंद्रवर्ती उपव्यवस्था कोणी मांडल्या आहेत ?
(A) ब्लूमफिल्ड
(B) सोस्यूर
(C) हॉकिट
(D) चॉम्स्की

**30.** अर्थ म्हणजे निर्देश, अर्थ म्हणजे वर्तन, अर्थ म्हणजे संकल्पना, अर्थ म्हणजे विचार अशी अर्थाची स्पष्टीकरणे दिली जातात तेच अर्थाचे प्रकारही होत.
(A) विधानाचा पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) विधानाचा पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर
(D) संपूर्ण विधान चूक

**31.** 'साबुदाणा', 'लिलाव', 'अलमारी', 'खमीस' हे शब्द कोणत्या भाषेतील आहेत ?
(A) उर्दू
(B) पर्शियन
(C) पोर्तुगीज
(D) तेलुगू

**32.** हौस, मजुरी, बेफाम, तसदी हे शब्द कोणत्या भाषेतून आले आहेत ?
(A) हिंदी (B) फारसी
(C) कन्नड (D) तमिळ

**33.** मदद > मदत, खूब > खूप ही शब्दपरिवर्तनाची प्रक्रिया कोणती ?
(A) घोषीकरण (B) महाप्राणीकरण
(C) मूर्धन्यीकरण (D) अघोषीकरण

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा (प्र.क्र. **34-38**) :

शहरांत राहावयाला आलो, तरी निसर्गाची संगत मी सोडलेली नाही. मुंबईत समुद्र हा माझा सोबती आहे. त्याच्या लाटांची अहोरात्र चाललेली मर्मर हे माझ्या जीवनांतले पार्श्वसंगीत आहे. भरतीच्या आणि ओहोटीच्या तालावर माझ्या मनोवृत्ती अक्षय नाचत असतात. किनाऱ्यावरच्या उंच उंच माडांच्या नि नारळींच्या झाडांप्रमाणे मीही वाऱ्याच्या सोसायट्यामध्ये धुंद होऊन अष्टौप्रहर डोलत असतो. पहाटेच्या वेळी अंगावर लाटांचे तुषार झेलीत ओल्या आणि भुसभुशीत वाळूवर अनवाणी पावलांनी चालण्यात केवढे काव्य आहे ? पण पुष्कळ लोक पायांत बूट घालून अन् सारे अंग लोकरी कपड्यांत पॅकबंद करून समुद्रावर हिंडायला येतात. मी त्यांना म्हणतो, "अरे, परमेश्वराचे तीर्थ उडू द्या थोडे अंगावर. त्याचा श्वास शिरू द्या तुमच्या नाकातोंडांत. निसर्गाच्या देवळांतही बाहेर जोडे ठेवून शिरायचे असते ।" पण कोण ऐकतोय ? निसर्गाला कोणी संधीच देत नाही. समुद्र म्हणजे त्यांना शत्रू वाटतो. अंगांत 'चिलखते' घालून त्याला भेटायला येतात. मुंबईच्या सागराप्रमाणे, खंडाळ्याचा डोंगरही माझा मित्र आहे. मी बारक्यासारक्या लोकांशी मैत्री करीतच नाही. ह्या डोंगरावर माझे एक घर आहे. पुष्कळदा मी तिथे राहतो. माझे सारे लेखन मी तिथेच करतो. मला काही 'योग' येत नाही. पण खंडाळ्याला गेलो की ताबडतोब माझी 'समाधी' लागते. माणसांचे जग मी पार विसरून जातो. उंच उंच डोंगरावर निळेभोर आभाळ बसलेले असते. तास न् तास मी त्याच्याशी गोष्टी करीत असतो. आभाळाच्या कापसांत बुबुळे गुंडाळून ठेवली म्हणजे उघड्या डोळ्यांनी झोपल्यासारखे वाटते. झाडाझुडपांच्या आणि झऱ्यांच्या संगतीत दिवस कसा निघून जातो हे कळत नाही.



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

34. शहरात राहायला येऊनही लेखकाने कशाची संगत सोडलेली नाही ?

(A) लोकरीच्या कपड्यांची

(B) तीर्थाची

(C) निसर्गाची

(D) परमेश्वराची

35. मुंबईत लेखकाचा सोबती कोण आहे ?

(A) समुद्र

(B) पार्श्वसंगीत

(C) देऊळ

(D) बूट

36. लेखकाच्या जीवनातील पार्श्वसंगीत कोणते ?

(A) भरती-ओहोटी

(B) सोसाट्याचा वारा

(C) लाटांची मर्मर

(D) काव्य

37. समुद्रकिनाऱ्यावर लेखक कोणाप्रमाणे डोलत असतो ?

(A) भरती-ओहोटीप्रमाणे

(B) सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणे

(C) माड नि नारळीच्या झाडांप्रमाणे

(D) लोकांप्रमाणे

38. निसर्गात कोणाचा श्वास नाकातोंडात शिरावा असे लेखक सांगतो ?

(A) भुसभुशीत वाळूचा

(B) तीर्थाचा

(C) परमेश्वराचा

(D) समुद्राचा

39. "निष्प्रेम चिरंजीवन तें ।
जगिं दगडालाही मिळतें ।। धिक् तया ।।
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा । मग पुढें ।।", या काव्यपंक्ती पुढीलपैकी कोणाच्या कवितेतील आहेत ?

(A) बालकवी

(B) ना.वा. टिळक

(C) केशवसुत

(D) गोविंदाग्रज

40. मराठी नवकवितेतील पुढील कवींचा कालानुक्रम सांगा :
विंदा करंदीकर, बा.सी. मर्ढेकर, नामदेव ढसाळ, दिलीप चित्रे

(A) बा.सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर, दिलीप चित्रे, नामदेव ढसाळ

(B) विंदा करंदीकर, बा.सी. मर्ढेकर, दिलीप चित्रे, नामदेव ढसाळ

(C) नामदेव ढसाळ, विंदा करंदीकर, बा.सी. मर्ढेकर, दिलीप चित्रे

(D) बा.सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर, नामदेव ढसाळ, दिलीप चित्रे

41. पुढील कादंबऱ्या व कादंबरीकार यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (a) वज्राघात | (i) गो.नी. दांडेकर |
| (b) वीरधवल | (ii) ह.ना. आपटे |
| (c) दर्या भवानी | (iii) ना.सं. इनामदार |
| (d) शहेनशहा | (iv) नाथमाधव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (A) | (a-i) | (b-ii) | (c-iv) | (d-iii) |
| (B) | (a-iv) | (b-iii) | (c-ii) | (d-i) |
| (C) | (a-ii) | (b-iv) | (c-i) | (d-iii) |
| (D) | (a-iii) | (b-i) | (c-ii) | (d-iv) |

42. 'गीताप्रवचने' या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) साने गुरूजी

(B) विनोबा भावे

(C) आचार्य जावडेकर

(D) लोकमान्य टिळक



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click Know More

**43.** प्रबंध, आख्याने, पदे, गौळणी, अभंग, भारुडे आणि स्फुट गद्य या सर्व प्रकारांत पुढीलपैकी कोणी रचना केली ?

(A) दासोपंत

(B) एकनाथ

(C) नामदेव

(D) रामदास

**44.** पुढील ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (a) भावार्थ दीपिका | (i) वामन पंडित |
| (b) यथार्थ दीपिका | (ii) मोरोपंत |
| (c) भावार्थ रामायण | (iii) दासोपंत |
| (d) गीतार्णव | (iv) ज्ञानेश्वर |

(A) (a-iii) (b-iv) (c-i) (d-ii)

(B) (a-iv) (b-iii) (c-ii) (d-i)

(C) (a-iv) (b-i) (c-ii) (d-iii)

(D) (a-ii) (b-iv) (c-iii) (d-i)

**45.** माधव जूलियन यांनी पुढीलपैकी कोणती खंडकाव्ये लिहिली ?

(i) विरह तरंग

(ii) सुधारक

(iii) जयमंगला

(iv) बंदिशाळा

(A) वरील विधानातील (i) आणि (ii) ही नावे बरोबर

(B) वरील विधानातील (i) आणि (iii) ही नावे बरोबर

(C) वरील विधानातील (ii) आणि (iv) ही नावे बरोबर

(D) वरील विधानातील (ii) आणि (iii) ही नावे बरोबर

**46.** भा.वि. वरेरकर यांनी 'मी रामजोशी' आणि 'फाटकी वाकळ' या कादंबऱ्या तसेच 'सत्तेचे गुलाम' आणि 'सोन्याचा कळस' ही नाटके लिहिली.

(A) वरील संपूर्ण विधान बरोबर

(B) वरील संपूर्ण विधान चूक

(C) विधानाचा पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

(D) विधानाचा पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर

**47.** खालील पाश्चात्य नाट्यकृती आणि त्यांची मराठी रूपांतरे यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (a) हॅम्लेट | (i) संशयकल्लोळ |
| (b) ऑथेल्लो | (ii) झुंझारराव |
| (c) कॉमेडी ऑफ एरर्स | (iii) विकारविलसित |
| (d) सिंबेलियन | (iv) तारा |

(A) (a-i) (b-iii) (c-iv) (d-ii)

(B) (a-ii) (b-iii) (c-i) (d-iv)

(C) (a-iv) (b-i) (c-iii) (d-ii)

(D) (a-iii) (b-ii) (c-i) (d-iv)

**48.** वृत्तपत्रीय जाहिरातींतील सर्वांत महत्त्वाचा घटक कोणता ?

(A) जाहिरातीची एजन्सी

(B) छायाचित्रयुक्त आकर्षक शब्दांकन

(C) लोकप्रिय व्यक्तींचे अभिप्राय

(D) जाहिरातीचा आकार

**49.** 'पुरोगामी साहित्य' या पुस्तकात कोणत्या दोन लेखकांचा साहित्यविषयक वाद समाविष्ट आहे ?

(A) वि.स. खांडेकर आणि ना.सी. फडके

(B) आचार्य शं.द. जावडेकर आणि ना.सी. फडके

(C) आचार्य शं.द. जावडेकर आणि वि.स. खांडेकर

(D) आचार्य अत्रे आणि गं.त्र्यं. माडखोलकर

**50.** 'आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा । माझिया सकळा हरिच्या दासा' हे पसायदान कोणी लिहिले ?

(A) तुकाराम

(B) ज्ञानेश्वर

(C) नामदेव

(D) एकनाथ



Latest Sarkari Jobs, Govt Exam Results, Vacancies and updates on one click
Know More

prepp

# Latest Sarkari jobs, Govt Exam alerts, Results and Vacancies

- Latest News and Notification
- Exam Paper Analysis
- Topic-wise weightage
- Previous Year Papers with Answer Key
- Preparation Strategy & Subject-wise Books

To know more **Click Here**

www.prepp.in